वाचले :- १) मा. महापालिका सभा ठराव क्र. ५०२४ दि. १०/१०/२००३

२) कायदा सल्लागार पिं.चिं. मनपा यांचेकडील पत्र क्र कास/२/कावि/२२/२०१७ दि.६/१/२०१७ अन्वये दिलेला अभिप्राय

३) आदेश क्र. लेखा/३/कावि/१३३/२०२० दि. १८/०५/२०२०

४) भारत सरकार,वित्त विभागाचे पत्र क्र. १/३/२०२२- E.II(B) दि.३/१०/२०२२

५) कर्मचारी महासंघ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे दि. ६ /१०/२०२२ चे पत्र

६ ) मा.आयुक्त यांचे कडील दिनांक ८/ १० / २०१८ चा मान्य प्रस्ताव

७ ) मा.आयुक्त यांचे कडील दिनांक २० / १० / २०२२ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८. लेखा विभाग
क्र. लेखा/१अ/कावि/९९३/२०२२
दिनांक :- २०/ १० /२०२२

विषय :- मनपा कर्मचा-यांना दिनांक १ जुलै २०२२ पासून सुधारीत दराने महागाई भत्ता मंजूर करण्याबाबत...

आदेश,

केंद्रशासनाच्या वित्त मंत्रालय खर्च विभागाकडील ज्ञापन क्रमांक १/३/२०२२ E.II(B) दि.३/१०/२०२२ अन्वये केंद्र सरकारने केंद्रीय कर्मचा-यांना दिनांक १ जुलै २०२२ पासून ३४ टक्के वरुन ३८ टक्के प्रमाणे महागाई भत्ता वाढ मंजूर केलेली आहे. महापालिका कर्मचा-यांना केंद्रीय कर्मचा-यांप्रमाणे महागाई भत्ता लागू करण्याचे धोरण उपरोक्त वाचले क्र. १ अन्वये ठरलेले असल्याने पिंपरी चिंचवड मनपा कर्मचा-यांना दिनांक १जुलै २०२२ पासून महागाई भत्ता वाढ मंजुर करणे आवश्यक आहे. मा.आयुक्त यांनी दिनांक ०८/१०/२०१८ च्या मान्य प्रस्तावान्वये म.न.पा.नियमित कर्मचा-यांबरोबर सेवानिवृत्त कर्मचारी यांना सुध्दा महागाई भत्ता वाढ मंजुर करणे बाबत मान्यता दिली आहे.

सबब, उपरोक्त वाचले क्रमांक १ ते ६ च्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड मनपा कर्मचा-यांना तसेच सेवानिवृत्त कर्मचारी व कुटुंब निवृत्तीवेतन धारक यांना सुध्दा केंद्रशासकीय कर्मचा-यांप्रमाणे दिनांक १ जुलै २०२२ पासून सातवा वेतन आयोगानुसार अनुज्ञेय महागाई भत्ता ३४ टक्के ऐवजी ३८ टक्के लागू करण्यात येत आहे. माहे ऑक्टोंबर २०२२ चे वेतन व पेन्शन बिल ३८ टक्के महागाई भत्ता विचारात घेऊन काढण्यात यावे. माहे जुलै २०२२ ते माहे सप्टेंबर २०२२ अखेरची महागाई भत्त्याची थकबाकी माहे नोव्हेंबर २०२२ चे वेतन देयके / पेन्शन देयका बरोबर काढण्यात यावी.

( शेखर सिंह )
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी

प्रति,

**सर्व संबंधित विभाग प्रमुख / शाखाप्रमुख**

प्रत :-

१) मा.आयुक्त कक्ष २) मा. अति आयुक्त कक्ष ( १,२,३)

३) मा.मुख्यलेखापरिक्षक कार्यालय ४) मा. कामगार कल्याण अधिकारी

५) मा. मुख्य माहीती व तंत्रज्ञान अधिकारी ६) मा.सहा.आयुक्त , प्रशासन

२/- वरील आदेशानुसार पगार बिलांमध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावेत.

(जितेंद्र कोळंबे )
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी